अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ६ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे ▸ अंक : २७७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## संपूर्ण राज्यात पावसाचा जोर वाढला



✔ **मुंबई** : राज्यात काही दिवसांपासून पावसाचा जोर कायम असून मुंबई ठाण्यासह कोकणात देखील मुसळधार पाऊस पडत आहे. या ठिकाणी पुढील काही दिवस रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई आणि कोकणात दि. ७ ते दि. ९ जुलै दरम्यान अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

मुंबईजवळ कमी दाबाचा पट्टा तयार होत असल्यामुळे येत्या ६ जुलै रोजी काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. तर मुंबई आणि ठाणे उपनगरांत सर्वाधिक पाऊस पडणार आहे. कोकणात रत्नागिरी जिल्ह्याला उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पुढील दोन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रासह विदर्भातही काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच मराठवाड्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडणार आहे. दुसरीकडे दडी मारून बसलेल्या पावसाने तब्बाल सव्वा महिन्यानंतर परभणी शहरासह जिल्ह्यात हजेरी लावली. परभणी शहरासह जिल्ह्यात मागील काही तासांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे.

# एमआयडीसीत गॅसचा भडका उडून तीन परप्रांतिय कामगारांचा मृत्यू





✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूरजवळच्या अक्कलकोट रोड एमआयडीसीतील एका टॉवेल कारखान्याच्या वरच्या मजल्यावरील घरात गॅसचा भडका उडून तीन परप्रांतिय कामगारांना होरपळून व धुरात गुदमरून मृत्यू झाला. चार कामगार सुदैवाने बचावले. ही घटना बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास घडली. सकाळची शिफ्ट सुरू होण्याअगोदर हे तीन कामगार स्वयंपाक करण्याच्या तयारीत होते. त्यावेळी शेगडी पेटवताच गॅसचा भडका उडाला.रात्री गॅस गळती झाल्याचा अंदाज त्यांना आलेला नसावा. त्यातून ही दुर्घटना घडल्याचे सांगण्यात आले. मनोज लक्ष्मीधर देहुरी (वय-२०, रा. पठारगड बाम, टेकनल ओरिसा), आनंद लक्ष्मीनारायण बगदी (वय-३०, रा.गलंदी वर्धमान, पश्चिम बंगाल), सहदेव बुद्धवार बगदी (वय-२२, रा.लोकुर, जि.वर्धमान पश्चिम बंगाल) असे मरण पावलेल्या कामगारांची नावे आहेत.**

याबाबतचे वृत्त असे की- एमआयडीसीत रूपम टॉवेल कारखाना आहे.कारखान्याच्या वरच्या मजल्यावर कामगारांसाठी राहाण्याची सोय करण्यात आली आहे. तिथे सात कामगार रहात होते.त्यापैकी तिघेजण सकाळी उठले आणि स्वयंपाक करण्याच्या तयारीला लागले.शेगडी पेटवताच गॅसचा भडका उडाला.त्या तिघांनी आरडाओरडा केल्यानंतर इतर चौघेजण खडबडून उठले.वरच्या खोलीत टॉवेलच्या पॅकिंगसाठी पुठ्ठे ठेवले होते.या सातही जणांनी पुठ्ठ्यांचा व टॉवलेचा वापर करून आग विझवण्याचा अटोकाट प्रयत्न केला.पण आग धुमसत गेली.पुठ्ठ्यांनाही आग लागली. बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले. सातजणांमधील चार कामगार जिवाला घाबरून बाहेर पडले मात्र तिघे आतच अडकले.त्यात त्या तिघांचा धुरात गुदमरून आणि आगीच्या ज्वालांनी होरपळून मृत्यू झाला.

आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे प्रमुख केदार आवटे हे आपल्या सहकाऱ्यांसोबत घटनास्थळी तात्काळ दाखल झाले.त्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांच्यासह पोलीस अधिकारी,कर्मचारी दाखल झाले.अग्निशामक दलाच्या जवानाकडून पाणी फवारून पाऊण तासात आग विझविण्यात आली. या आगीत टॉवेल पॅकिंग करण्यासाठी असलेले कॉटन बॉक्स, वायरिंग, कंपार्टमेंट असे जवळपास सात लाखांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे मिलचे मॅनेजर यांनी सांगितले. शवविच्छेदनासाठी मृतदेह शासकिय रुग्णात दाखल केले आहे.याबाबत त्या कामगारांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली असून,नातेवाईक सोलापूरला येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. पद्मशाली नगर परिसरात शशिकांत मोहन सीता यांच्या मालकीचा हा कारखाना आहे.

### मनुष्यहानीची पहिलीच घटना

यापूर्वी एमआयडीसी भागांमधील बऱ्याच मोठमोठ्या कारखान्यांना आगी लागल्या होत्या. आगीत करोडो रुपयांचे नुकसान देखील झाले होते. मात्र बुधवारी सकाळी रुपम वीविंग या मिलला आग लागली आणि या लागलेल्या आगीमध्ये तीन जणांचा मृत्यू होऊन मनुष्यहानी झाली आहे, असे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांनी 'सुराज्य'शी बोलताना सांगितले.

### त्या चौघांनी शर्थीचे प्रयत्न केले...

अकबर नरुलहक आलाम,ताहीर अब्दुलगपूर आलाम (दोघे.रा.बिहार) तर अभयसिंग सूर्यनारायण व मुन्ना राजभर (दोघे.रा.उत्तर प्रदेश) हे गॅसचा भडका उडून लागलेल्या आगीतून सुखरूप बाहेर पडून आग विझवण्याचा व आगीत अडकलेल्या तिघा जणांचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र आग जास्त भडकल्याने या आगीत तिघांचा होरपळून मृत्यू झाला.

### घटनाक्रम

- अग्निशामक विभाग दहा मिनिटात घटनास्थळी
- दहा गाड्या पाणी फवारून पाऊण तासात आग विझवली
- ग्राऊंड फ्लोअरवरील कारखान्याचे काही नुकसान नाही
- पहिल्या मजल्यावरील कार्टुन बॉक्स, टॉवेल जळून खाक
- कारखान्याच्या पहिल्या मजल्यावर कारखान्याचा माल व कामगारांना राहण्याची एकत्रित होती व्यवस्था
- मिल मध्ये एकूण तीन शिफ्ट मध्ये काम चालते
- शंभर ते सव्वाशे कामगार या ठिकाणी करतात काम
- ही घटना मृत कामगारांच्या नातेवाईकांना सांगण्यात आली आहे.

## रे नगर प्रकल्पातील घरकूल योजना, जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

### केंद्रातील अधिकारी ८ व ९ जुलैला सोलापुरात

✔ सुराज्य/सोलापूर

असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कुंभारीच्या माळरानावर साकारत असलेल्या रे नगर गृहप्रकल्पातील ३० हजार पैकी पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांच्या हस्तांतरणासाठी हालचालींना वेग आला असून याचा पाठपुरावा थेट दिल्लीतील पंतप्रधान आवास योजना कार्यालयातून करण्यात येत आहे. दरम्यान, येत्या ८ व ९ जुलै रोजी केंद्रातील वरिष्ठ अधिकारी या प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी बुधवारी पुण्यातून दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन आढावा घेतला.

पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांच्या चाव्या येत्या नोव्हेंबर महिन्यात पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. ८ व ९ जुलै रोजी पंतप्रधान आवास योजना कार्यालयातून केंद्रीय स्तरावरचे अधिकारी येत आहेत. हा दौरा जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्याने जिल्हाधिकारी शंभरकर हे पुण्यात असतानाही त्यांनी तातडीची बैठक घेऊन व्हीसीद्वारा आढावा घेतला.

या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, रे नगर फेडरेशनचे मुख्य प्रवर्तक, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, चेअरमन नलिनी कलबुर्गी, सचिव युसुफ शेख मेजर, विकासक अंकुर पंधे, अभियंता मेहुल मुळे, लक्ष्मण माळी, वीरेंद्र पद्मा, ॲड. अनिल वासम उपस्थित होते.

रे नगर येथे वीज, २४ तास पाणी, मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते, पथदिवे, शाळा, अंगणवाडी, वनीकरण यासारख्या महत्वाच्या विषयावर सर्व संबंधित खात्याचे अधिकाऱ्यांशी स्वतः जिल्हाधिकारी शंभरकर यांनी संपर्क साधून आढावा घेतला.

## नूतन जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न

✔ सुराज्य/सोलापूर

माढा तालुक्यातील मानेगाव ग्रामपंचायत हद्दीतील माळी स्मशानभूमी जिल्हा परिषदेच्या चौदाव्या वित्त आयोगातून घेतलेल्या बोरच्या निधीचा गैरवापर राष्ट्रवादीचे सदस्य, ग्राम सेवक ,विस्तार अधिकारी यांनी मनमानी कारभार करत केला आहे. या संदर्भात वारंवार तक्रारी करून देखील दखल घेतली जात नसल्याने बुधवारी आलम जमादार आणि दीपक देशमुख यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विषारी औषध प्राशन करून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला. सदर प्रकरणात भाजपाचे एका मंत्र्याने लक्ष घालत मध्यस्थी केल्याने घटना स्थळाची पाहणी करण्यासाठी एक पथक पंचनाम साठी जाणार आहे.

ग्रामपंचायत १४ व्या वित्त आयोगातून मारलेला बोअर चोरीला गेला आहे. त्याची वारंवार तक्रार सोलापूर जिल्हा परिषद व कुर्डुवाडी पंचायत समितीकडे केली. त्यांच्या कडून कोणत्याही प्रकारची चौकशी केली गेली नाही तसेच या प्रकरणा बाबत पूर्ण कागदपत्रे पुरावे सादर केली असताना देखील कोणतीही कार्यवाही केली जात नाही .त्यामुळे आलम जमादार आणि दीपक देशमुख यांनी जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन यासंदर्भात रीतसर कारवाई करावी दोषींवर गुन्हे दाखल करावे अन्यथा ५ जुलै रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार जमादार आणि देशमुख हे पोलिसांची नजर चुकून बुधवारी नूतन जिल्हाधिकारी कार्यालयात आले. मात्र या दोघांच्या मागावर असलेल्या पोलिसांनी त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेट जवळच अडवले आणि त्यांची झाडाझडती घेत त्यांच्या खिशातून विषयाची बाटली काढून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्यानंतर दोघांनी आपले गॉडफादर विद्यमान मंत्री गिरीश महाजन यांना मोबाईल द्वारे संपर्क साधला. त्यानंतर मंत्रालयातून जिल्हा प्रशासनाचा फोन वाजला अन जिल्हा प्रशासनामध्ये एकच धावपळ सुरू झाली. या दोघांची भेट निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्याशी करून देण्यात आली. सदरची तक्रार क्षमा पवार यांना सांगितल्यानंतर सहा दिवसांमध्ये सदर प्रकरणाचा पंचनामा करून व्हिडिओ चित्रीकरण पाहणी करण्याचे आश्वासन दोघांना दिले.

### पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

मंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर जिल्हा परिषदची यंत्रणा देखील गतिमान झाली सामान्य प्रशासन विभागाने कुर्डवाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि उप विभागिय अभियंता यांना पत्र पाठवत सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून सात दिवसाच्या आत या प्रकरणाचा अभिप्राय सादर करण्याचे आदेश ग्रामपंचायत विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिला आहे.

---

राष्ट्रवादीच्या सदस्यांनी बोर न घेता पैसे हडप केल्याची तक्रार आम्ही केली होती. दखल नघेतल्याने आम्ही जिल्हा प्रशासनास यापूर्वी आत्मदहनाचा इशारा दिला होता. कोणतीही कारवाई न झाल्यामुळे आम्ही हे पाऊल उचलले मात्र पोलिसांमुळे आमचा प्रयत्न फसला.सात दिवसात तर कारवाई नाही झाल्यास पुन्हा आम्ही आत्मदहन करू.

**–आलम जमादार तक्रारदार**

## दोन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांमध्ये खुर्चीवरून वाद

### 'एक पद, एक प्रभारी' तर दुसरे अधांतरी

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात जिल्हा आरोग्य अधिकारी नेमके कोण? असा वाद सुरू आहे. विद्यमान सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागाडे यांच्याकडे सध्या आरोग्य विभागाचे प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारीपद आहे. असे असताना त्याच जागेवरती धुळे येथून डॉ. संजय नवले यांची जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून नुकतीच राज्य शासनाकडून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे दोघही आरोग्य खात्यात आहेत. डॉ.बागाडे यांनी चार्ज सोडला नसल्याने आरोग्य अधिकारी कोण? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र वरून आदेश येईपर्यंत डॉ.नवले यांनी काम करावे, अशी लेखी सूचना आल्याने जिल्हा परिषद प्रशासन संभ्रमावस्थेत आहेत.

### आरोग्य खात्याकडून माहिती मागवली : स्वामी

सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी सोनिया बगाडे यांच्याकडे जिल्हा सहाय्यक आरोग्य अधिकारी म्हणून प्रभारी चार्ज देण्यात आला होता. त्याच ठिकाणी धुळे येथून डॉ.संजय नवले यांची वरून आदेश येईपर्यंत त्याच पदावर नियुक्ती केली आहे .त्यामुळे नेमके काय करायचे याबाबत आरोग्य खात्याकडून माहिती मागवल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी म्हणाले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



राजकारणावरील बातम्या आवडीने ऐकायचा ना!!!

| कल्याण |
|---|
| 168-56-123 |

| मुंबई |
|---|
| 789-42-138 |

# मुंबईत राष्ट्रवादीचा 'हायहोल्टेज' ड्रामा, एकमेकांवर हल्लाबोल

## अजितदादांच्या ३२ तर शरद पवारांच्या बैठकीतला १३ आमदार उपस्थित

✔ सुराज्य/मुंबई

**राज्यात सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमधल्याच दोन गटांमध्ये चालू असलेल्या कलगीतुऱ्याची जोरदार चर्चा चालू आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एक गट सरकारमध्ये सहभागी झाला असून एक गट अजूनही शरद पवारांसोबत आहे. या पार्श्वभूमीवर आज मुंबईत दोन्ही गटांच्या 'हायहोल्टेज' बैठकांचं आयोजन करण्यात आलं होतं. यात अजित पवार गटाच्या बैठकीत नेतेमंडळींनी शरद पवारांना व त्यांच्या धोरणांना लक्ष्य करताना आपापल्या भूमिका मांडल्या. अजित पवारांनी शरद पवारांवर अनेक मुद्द्यांवरून एकामागून एक बाण सोडले. तर दुसरीकडे शरद पवार गटाच्या बैठकीत शरद पवारांनी अजित पवारांच्या आरोपांवर सडेतोडत उत्तरे देऊन नामोहरम केले. एकंदर मुंबईत आज राष्ट्रवादीतील दोन्ही गटांनी एकमेकांवर चांगलाच हल्लबोल केला. अजित पवारांनी बोलावलेल्या बैठकीला ३२, तर शरद पवारांनी बोलावलेल्या बैठकीला १३ आमदार उपस्थित होते.**

सकाळी ११ वाजता अजित पवार गटाने वांद्रे येथील एमईटी संस्थेत बैठक घेतली तर शरद पवार गटाने दुपारी १ वाजता वाय. बी. सेंटरमध्ये आपापल्या समर्थकांची बैठक घेतली. यावेळी दोन्ही गटांनी दावे-प्रतिदावे करीत शक्तिप्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला.

अजित पवारांनी २ जूनला मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादीच्या ८ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. तत्पूर्वी अजित पवारांनी ३० जूनला ४० आमदारांच्या सह्यांचं एक पत्र घेतलं. हेच पत्र आज अजित पवारांनी निवडणूक आयोगाला पाठवलं आहे. अजित पवार राष्ट्रवादीचे अध्यक्ष असल्याचा ठराव मंजूर करण्यात आल्याची माहिती अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगाला देण्यात आली आहे. हा शरद पवारांना मोठा धक्का मानला जात आहे.

दरम्यान मुंबईतील वायबी चव्हाण सेंटर सभागृहात शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे एकूण १३ विधानसभा आमदार, ३ विधानपरिषद आमदार आणि ५ खासदार उपस्थित आहेत. त्यामुळे अजित पवार यांच्याकडेच विधानसभेच्या आमदारांचं संख्याबळ अधिक असल्याचं दिसलं आहे.

आपल्यासोबत संपूर्ण पक्ष असल्याचा दावा अजित पवारांनी याआधी केला होता. चिन्ह आणि पक्ष यावर अजित पवारांचा दावा होता. मात्र आता त्यांनी थेट अध्यक्षपदावर दावा केला आहे. आपली सर्वानुमते राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचं त्यांनी निवडणूक आयोगाला कळवलं आहे. त्यासाठी त्यांनी ४० आमदारांच्या स्वाक्षरीचं पत्र सोबत जोडलं आहे. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याच्या दोन दिवसांपूर्वी अजित पवारांनी ४० आमदारांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या. तेच पत्र आज निवडणूक आयोगाला पाठवण्यात आलं आहे. एकूण ५३ आमदारांपैकी दोन तृतीयांश आमदारांसाठी अजित पवार यांना ३६ आमदारांची आवश्यकता आहे. अजित पवार यांच्याकडे ४० आमदार आणि ३ खासदारांनी प्रतिज्ञापत्रावरती पाठिंबा लिहून दिला आहे. त्यामुळे खरी राष्ट्रवादी अजित पवार यांच्याकडेच आहे, असे सांगण्यात येते.

### माझ्याशिवाय नाणं वाजणार नाही : शरद पवार



राष्ट्रवादी पक्षाचे चिन्ह कुठे जाणार नाही, असे सांगून खा. शरद पवार बैठकीत म्हणाले, आज काही जणांनी मेळावा घेतला, त्यात सर्वात मोठा फोटो माझा होता. त्यांना माहितीय की त्यांचं नाण वाजणार नाही, त्यामुळे फोटाचा वापर केला जातोय. त्यांनी काही भाष्य केले त्यावर मी काही बोलणार नाही. आज मुंबईत अनेक ठिकाणी पोस्टर लावले त्यात फोटो माझा होता. त्यांना माहीत आहे आपले नाण चालणार नाही, पण पांडुरंगाच्या दर्शनाला तुम्ही थांबवू शकत नाही, असेही पवार म्ङणाले.

### माझ्या दैवताला माझी विनंती आहे : अजित पवार



आपली राष्ट्रीयत्वाची मान्यता रद्द झालीये. ती आपल्याला परत मिळवायची आहे. हे सगळं मी तुमच्या सगळ्यांच्या मदतीने केलं आहे. २०२४ ला होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा ७१ चा सर्वाधिक गाठायचा आहे, त्यावेळी ९० जागा आपण लढवणार आहोत. माझी अजूनही माझ्या दैवताला विनंती आहे की अजूनही आमच्या पांडुरंगानं आम्हाला आशीर्वाद द्यावा, असं एकीकडे सांगत अजित पवार यांनी शरद पवारांना लक्ष्य करीत तुम्ही जिथे सभा घ्याला, तिथे जाऊन मीही सभा घेऊन पोलखोल करेन, असा इशारा दिला.

### आम्हाला समजून घ्या : प्रफुल्ल पटेल



माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल म्हणाले, मी विनंती करतो, मी हात जोडून, पाय जोडून त्यांना (शरद पवार) विनंती करतो. पवार साहेब आमचं दैवत आहेत. आमची पण भावना तुम्ही समजून घ्या आणि आम्हाला आशीर्वाद द्या. आपला हा एक मोठा राष्ट्रवादी काँग्रेस परिवार आहे. तुमच्या आशीर्वादाने आम्ही सगळे योग्य दिशेने काम करू इच्छितो.